दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक २६१ | MAHMAR/2006/17212 | रायगड | शुक्रवार, दि.१९ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## आमदारकीचा राजीनामा देवून प्रज्ञा सातव भाजपमध्ये

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राहुल गांधी यांचे निकटवर्तीय राहिलेले दिवंगत नेते राजीव सातव यांच्या पत्नी, काँग्रेस नेत्या प्रज्ञा सातव यांनी विधान परिषदेच्या आमदारकीचा राजीनामा दिला आहे. प्रज्ञा सातव यांनी राजीनाम्यानंतर अवघ्या काही तासातच भारतीय जनता पक्षाचा झेंडा हाती धरला. त्यामुळे मराठवाड्यात पक्षाचं बळ वाढलं आहे. आगामी महापालिका निवडणुकांच्या तोंडावर महाराष्ट्र काँग्रेससाठी हा हिंगोलीत मोठा धक्का मानला जातोच, मात्र राहुल गांधी यांच्या निष्ठावान नेत्यांच्या कुटुंबीयांनी 'हात' सोडल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

प्रज्ञा सातव या काँग्रेसच्या तिकिटावर विधान परिषद आमदार होत्या. ऑगस्ट २०२१ पासून त्या महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षा म्हणूनही कार्यरत होत्या. नोव्हेंबर २०२१ मध्ये महाराष्ट्र विधान परिषदेवर त्यांची बिनविरोध निवड झाली होती. त्या महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाकडून विधान परिषदेवरील एकमेव महिला सदस्य होत्या.

# कर्जत पनवेल ३०० मीटर बोगदा पूर्ण ; लवकरच धावणार लोकल

**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान ।** कर्जत-पनवेल रेल्वे मार्गिका लवकरच सुरू होण्याच्या तयारीत आहे. या मार्गिकेसाठीचा ३०० मीटर लांबीच्या नव्या बोगद्याचं काम पूर्ण झालं असून, यामुळे मार्गिकेसाठीचा मोठा टप्पा पार पडला आहे.

मागील कित्येक वर्षांपासून कर्जत-पनवेल रेल्वे मार्गाची प्रतिक्षा आहे. अखेर आता कर्जत-पनवेल मार्गावरील उपनगरीय लोकल सेवा लवकरच पूर्ण होणार आहे.

कर्जत - पनवेल या मार्गिकेसाठी डोंगर फोडून एक बोगदा उभारण्यात आला आहे. कित्येक दिवस या मार्गाचं काम सुरू होतं. आता किरवली-वांजळे गावाजवळील ३०० मीटर लांबीचा हा नवा बोगदा आता पूर्ण झाला आहे.



या बोगद्यात आता रूळ टाकण्याचं काम बाकी आहे. बोगद्याचं काम यशस्वीरित्या पूर्ण झाल्याने या मार्गावरील मोठा अडथळा आता दूर झाला आहे.

२००५ मध्ये बांधलेला जुना हलीवली बोगदा ठिसूळ असल्याने दगड कोसळण्याच्या घटना घडत होत्या. त्यामुळे हा मार्ग रेल्वे, लोकलसाठी सुरक्षित नव्हता. त्यामुळे मध्य रेल्वेने पनवेल-कर्जत दरम्यान नवीन आणि सुरक्षित मार्ग उभारण्याचा निर्णय घेतला. यातून चौक ते कर्जत हा पूर्णपणे नवा मार्ग आणि पनवेल ते चौक हा जुना मार्ग वापरून हा प्रकल्प तयार केला जात आहे.


या नव्या मार्गावर कर्जत तालुक्यात किरवली आणि वांजळे गावांच्या हद्दीत एक मोठा बोगदा बांधण्यात आला आहे. हा बोगदा दुहेरी मार्गांसाठी पुरेशी जागा ठेवून बांधला आहे. या बोगद्याचं बांधकाम भविष्यातील वाढती गर्दी लक्षात घेऊन करण्यात आलं आहे. तशीच त्याची रचना केली आहे.

बोगद्याचं एक टोक किरवली गावात, तर दुसरं टोक वांजळे गावात आहे. या बोगद्यानंतर कर्जत-कल्याण राज्यमार्ग लागतो, ज्यावर आधीच उड्डाण पूल तयार आहे.

त्यामुळे या नव्या रेल्वे मार्गामुळे रस्ते वाहतुकीला कोणताही अडथळा येणार नाही. बोगद्याचं बांधकाम पूर्ण झालं असून मार्गिका तयार असल्याने कर्जत-पनवेल रेल्वे मार्ग आता उपनगरीय सेवेसाठी सज्ज झाली आहे. बोगद्याची संरचनात्मक कामं पूर्ण झाली असून ही मार्गिका तयार असल्याने कर्जत-पनवेल रेल्वे मार्ग लोकल सेवेसाठी तयार झाला आहे.

### १५ जानेवारीला होणाऱ्या मतदानासाठी पनवेल महापालिका प्रशासनाची जय्यत तयारी

# मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न : आयुक्त मंगेश चितळे





**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानूसार महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५ चा कार्यक्रम अधिसूचनेद्वारे आज जाहिर करण्यात आला आहे. या कार्यक्रमानूसार १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. या अनुषंगाने निवडणूक प्रक्रिया सुरळीत व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, निवडणुकीचा प्रत्येक टप्पा अचूकपणे पार पाडण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ आणि तांत्रिक सुविधांचे चोखपणे नियोजन केले आहे.

शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासोबतच आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी व्हावी, यासाठी पोलीस प्रशासन आणि महापालिका यंत्रणेमध्ये समन्वय ठेवण्यात आला आहे. तसेच निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नियुक्तीपासून ते भरारी पथकांच्या तैनातीपर्यंतची सर्व तयारी पूर्ण झाली असून, लोकशाहीचा हा उत्सव यशस्वी करण्यासाठी पनवेल महानगरपालिका प्रशासन पूर्ण क्षमतेने सज्ज तयार आहे, अशी माहिती आयुक्त तथा निवडणूक अधिकारी मंगेश चितळे यांनी आज दिली.

माननीय राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेनुसार पनवेल महापालिकेची अंतिम प्रभाग रचना ६ ऑक्टोबर २०२५ रोजी अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध करण्यात आली होती. शहरात एकूण २० प्रभाग असून प्रत्येक प्रभागात ३ सदस्य याप्रमाणे एकूण ७८ सदस्य संख्या निश्चित करण्यात आली असून त्यापैकी ५० टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

निवडणुकीच्या काळात होणाऱ्या गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी देखील आवश्यक बंदोबस्त करण्यात आला आहे. प्रचार फेऱ्या, सभा आणि अवाजवी खर्चावर लक्ष ठेवण्यासाठी मुख्यालय व क्षेत्रीय स्तरावर व्हिडिओग्राफी सर्व्हेलियन्स पथकांची नेमणूक करण्यात आली आहे.तसेच शहराच्या विविध नाक्यांवर शस्त्रास्त्रे व अवैध वस्तूंच्या वाहतुकीला प्रतिबंध करण्यासाठी चेक पोस्ट पथके कार्यरत राहतील. आचारसंहिता भंगाची कोणतीही तक्रार आल्यास त्यावर तातडीने कार्यवाही करण्यासाठी महापालिका व प्रभाग स्तरावर तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

शहरातील सर्व नागरिक, उमेदवार आणि राजकीय पक्षांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन निवडणूक अधिकारी तथा आयुक्तांनी केले आहे. पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका मुक्त, निष्पक्ष व शांततेत पार पडाव्यात, यासाठी प्रशासन सज्ज असून नागरिकांनीही निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

### सहा क्षेत्रीय कार्यालय

निवडणूक कामकाजासाठी प्रशासनाने ६ क्षेत्रीय कार्यालयांच्या माध्यमातून भक्कम यंत्रणा उभी केली आहे. एकूण ६ निवडणूक निर्णय अधिकारी आणि १२ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. संपूर्ण निवडणूक प्रक्रियेकरिता ६ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये सुमारे साडे चार हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांची आवश्यकता लागणार आहे. महापालिका क्षेत्रासाठी आचारसंहिता पथक प्रमुख आणि उमेदवारांचे हिशोब तपासणी पथक प्रमुख यांचीही स्वतंत्रपणे नेमणूक करण्यात आली आहे. आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महापालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक संनियंत्रण समिती गठीत करण्यात आली असून, यामध्ये पोलीस आयुक्त व महापालिका अतिरिक्त आयुक्त यांचा समावेश आहे.

### मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न

निवडणूक प्रक्रियेत मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी आणि मतदानाची टक्केवारी उंचावण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने मतदान जनजागृती कार्यक्रमांतर्गत (डतएएझ) व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेद्वारे मनपा क्षेत्रातील तरुण मतदार, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदारांना मतदानाचे महत्त्व पटवून दिले जाणार आहे.

# सहलीची बस आंबेनळी घाटात कलंडली



**दै.रायगड नगरी । शैलेश पालकर**

**पोलादपूर ।** पोलादपूर ते महाबळेश्वर रस्त्याच्या रूंदीकरणाच्या कामामुळे रस्त्याची दूर्दशा झाली असून प्रतापगड दर्शनानंतर महाबळेश्वरकडे जाणारी सहलीची बस आंबेनळी घाटात रस्त्यालगतच्या चरामध्ये कलंडल्याची घटना झाली. या अपघातात दरीच्या बाजूऐवजी रस्त्यालगत डोंगराच्या बाजूच्या चरामध्ये सहलीची बस कलंडल्याने मोठा जीवघेणा अपघात टळला आहे.

समर्थ ट्रॅव्हल्सची खासगी रामेश्वर आरामबस (एमएच ४७ वाय ७९९२) ही सहलीच्या विद्यार्थ्यांना घेऊन प्रतापगड दर्शनानंतर महाबळेश्वरकडे निघाली असताना आंबेनळी घाटात या आरामबसचा टायर रस्त्यालगत खोदण्यात आलेल्या चरात अडकल्याने बसचा पुढील टायर अधांतरी राहिला. या प्रकारामुळे आरामबसमधील विद्यार्थी व शिक्षक तसेच बसचे कर्मचारी यांच्या किंचाळयांनी परीसरामध्ये भितीदायक वातावरण निर्माण झाले. सुदैवाने या अपघातात विद्यार्थी, शिक्षक व चालक यांना कोणतीही दुखापत झाली नाही. मात्र या अपघातामुळे आंबेनळी घाटामध्ये काही काळ वाहतुकीचा खोळंबा झाला आणि ही अपघातग्रस्त आरामबस काही वेळानंतर क्रेनच्या सहाय्याने बस चरातून बाहेर काढेपर्यंत अनेक वाहनचालकांना या ट्रॅफिक जॅममध्ये अडकून मनस्ताप झाला. अपघाताच्या ठिकाणी आंबेनळी घाटातील तीव्र वळणाचा योग्य अंदाज न आल्याने बस रस्त्याच्या कडेला घसरत ठेकेदारांनी रस्त्यावरील पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी खणलेल्या चरांमध्ये अडकली. आरामबसचा टायर चरामध्ये अडकल्याचे समजताच स्थानिक नागरिक, अडकलेले वाहनचालक आणि दुचाकीस्वारांनी तात्काळ मदतकार्य करत विद्यार्थ्यांना बसमधून बाहेर काढले.

# अल्पवयीन मुलीला पळवून नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार करणाऱ्यास खारघर पोलिसांनी केली अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर परिसरातून १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिला पळवून नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार करणाऱ्यास खारघर पोलिसांनी अटक केली आहे. अजयकुमार जनझोरड (२९) असे त्याचे नाव असून, पोलिसांनी त्याच्या ताब्यातून पीडित मुलीची सुटका करून तिच्या कुटुंबीयांच्या ताब्यात दिले.

अजयकुमार हा खारघरमधील पेठ गावात राहण्यास होता. गेल्या काही महिन्यापूर्वी आरोपी अजयकुमार याने पीडित मुलीसोबत प्रेमसंबंध निर्माण केले होते. त्यानंतर त्याने संधी साधून पीडित मुलीला पळवून नेत तीला कळंबोली लेबर कॅम्प मधील रूमवर नेऊन ठेवले होते. पीडित मुलीने तिची आई काम करत असलेल्या मॅडमच्या घरी जाते असे लहान बहिणीला सांगून घरातून निघून गेली होती.

मात्र, सायंकाळपर्यंत घरी परतली नव्हती. त्यामुळे तिच्या घरच्यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीनुसार खारघर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली होती. या तपासादरम्यान पोलिसांनी

परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता, पीडित मुलगी एका तरुणासोबत दुचाकीवरून गेल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर खारघर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजमध्ये दुचाकीचा नंबर मिळवून त्याच्या मालकाचा शोध घेतला असता, ही दुचाकी अजयकुमार याची असल्याचे समोर आले.

त्यानंतर पोलिसांनी त्याचा शोध घेऊन खारघरमधील पेठ गावातून ताब्यात घेतले. त्यानंतर त्याची अधिक चौकशी केल्यानंतर त्याने आपला गुन्हा कबूल करत पीडित मुलीला कळंबोली येथील लेबर कॅम्पमधील घरामध्ये ठेवल्याचे सांगितले.

त्यानंतर पोलिसांनी पीडित मुलीला कळंबोली येथून ताब्यात घेऊन तिला तिच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन केले. दरम्यान, पोलिसांनी पीडित मुलीची वैद्यकीय तपासणी केली असता, अजयकुमार याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर खारघर पोलिसांनी त्याच्या विरोधात विविध कलमांखाली गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

### रायगड जिल्ह्यात राजकीय भूकंप....

# आ.महेंद्र थोरवे यांच्या मनमानी व एकतर्फी कारभाराला कंटाळून पदाधिकाऱ्यांचे सामुहिक राजीनामे

### आणखीन अनेक पदाधिकारी आपला राजीनामा पक्ष श्रेष्टीकडे करणार सुपूर्त

**दै.रायगड नगरी । विठ्ठल ममताबादे**

**उरण ।** उरण विधानसभा मतदार संघात गेले अनेक वर्षे काम करणाऱ्या शिवसेना(शिंदे गट ) पक्षातील पदाधिकारी कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता, त्यांची बाजू न ऐकता कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांनी उरण विधानसभा मतदार संघात / कार्यक्षेत्रात प्रभारी जिल्हाप्रमुख म्हणून विनोद साबळे यांची नियुक्ती केली आहे. ही नियुक्ती कोणालाही विश्वासात न घेता केल्याने शिवसैनिकांमध्ये असंतोषाचे वातावरण पसरले आहे. त्यातच आमदार महेंद्र थोरवे यांच्याकडून काही पदाधिकारी कार्यकर्त्यांना त्रास देण्याचे काम सुरू असल्याचा व शिवसेना पक्ष वाढीला विरोध करून वारंवार मनमानी, एकतर्फी कारभार करत असल्याचा आरोप उरण विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी केला असून आमदार महेंद्र थोरवे यांच्या मनमानी व एकतर्फी कारभाराचा निषेध म्हणून रायगड जिल्ह्यातील उरण विधानसभा मतदारसंघातील अनेक पदाधिकारी कार्यकर्त्यांनी आपले सामुहिक राजीनामे संजय मोरे - सचिव शिवसेना, बाळासाहेब भवन, मुंबई यांच्याकडे सुपूर्त केले आहेत.

उरण तालुका प्रमुख दिपक ठाकूर व पनवेल तालुका प्रमुख रघुनाथ पाटील या पदाधिकाऱ्यांनी त्वरित आपले राजीनामे वरिष्ठाकडे सुपूर्त केले आहे. उरण व पनवेल तालुक्यातील दोन्ही तालुका प्रमुख यांच्यासह अनेक पदाधिकारी कार्यकर्त्यांनी आपले राजीनामे वरिष्ठाकडे सुपूर्त केल्याने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली असून गेली अनेक वर्षे शिवसेना पक्षात असणाऱ्या व एकनिष्ठ प्रामाणिकपणे कोणताही स्वार्थ न बाळगता काम करणाऱ्या पदाधिकारी कार्यकर्त्यावर होत असलेला अन्याय या घटनेतून समोर येत आहे.



पक्ष वाढीसाठी रात्रंदिवस मेहनत घेणाऱ्या उरण विधानसभा जिल्हाप्रमुख अतुल भगत यांना पदावरून बाजूला केल्याने पदाधिकारी कार्यकर्ते नाराज असून ज्या पदाधिकाऱ्यांनी विधानसभा मतदारसंघात शिवसेना वाढीसाठी प्रयत्न केले शिवसेनेचा विचार व कार्याचा तळागाळात प्रचार केला, प्रसार केला त्या जिल्हाप्रमुख अतुल भगत यांना पदावरून बाजूला केल्याने शिवसैनिक संतप्त झाले आहेत.

या सर्व पार्श्वभूमीवर अनेक पदाधिकारी कार्यकर्त्यांनी सामुहिक राजीनामे दिले असून अनेक पदाधिकारी कार्यकर्ते सामूहिक राजीनामे देण्याच्या तयारीत आहेत.

पक्षाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता पद नियुक्ती होत असल्याने व त्याचा फटका पदाधिकारी कार्यकर्त्यांना बसत असल्याने होणाऱ्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत शिवसेना पक्षाला मोठा फटका बसण्याची चिन्ह दिसत आहे.

# शेतात तयार झाल्या प्रचंड 'विहिरी'!

धान्याचं जास्त उत्पादन तुम्ही काढलंत तर काय होईल? - हे धान्य तुम्ही बाजारात विकलं तर तुम्हाला त्याचे जास्त पैसे मिळतील, घरासाठीच ठेवलं, तर जास्त काळ पुरेल, गरजेपेक्षा जास्त उत्पादन काढलं, तर तुमच्या शेतीची उपज कमी होईल, पण जास्त उत्पादन काढल्यामुळे तुमच्या शेतात विहिरींपेक्षाही मोठे खड्डे तयार झाले आणि तुम्हाला स्थलांतर करावं लागलं तर?.. मोठे म्हणजे किती? तर जवळपास शंभर फूट रुंद आणि तीस फूट खोला तुर्कीमध्ये सध्या हेच होत आहे. त्यामुळे त्या देशातले शेतकरी आणि सरकारही प्रचंड हादरलं आहे. सर्वसाधारणपणे विहिरीची खोली सुमारे वीस ते तीस मीटर असते, तर रुंदी अडीच ते चार मीटर असते! आता हे प्रमाण पाहिलं तर हे खड्डे किती प्रचंड मोठे आहेत याची कल्पना येईल! जास्त गहू उत्पादनामुळे तुर्कीमध्ये सध्या असे मोठमोठे खड्डे निर्माण होताहेत! तुर्कीचं अन्नभांडार म्हणून ओळखलं जाणारं कोन्या मैदान सध्या या गंभीर समस्येला सामोरं जात आहे. इथे तुर्कीमधील सर्वाधिक गहू पिकवला जातो. कोन्या मैदानाचं एकूण कृषी क्षेत्र सुमारे २.६ दशलक्ष हेक्टर आहे, जे तुर्कीच्या एकूण कृषी क्षेत्राच्या ११.२ टक्के आहे. क्षमतेपेक्षा जास्त उत्पादन आणि ग्राउंड वॉटरचा अतिवापर यामुळे हा परिसर गेल्या काही काळापासून दुष्काळाचा सामना करत आहे. यामुळे लोकांची शेतजमीन उद्ध्वस्त होत आहे.भकेवळ कोन्यामध्येच आतापर्यंत सुमारे सातशे खड्डे तयार झाले आहेत. कोन्या टेक्निकल युनिव्हर्सिटीच्या सिंकहोल रिसर्च सेंटरनुसार, २०१७मध्ये २९९ सिंकहोल होते, जे २०२१ पर्यंत वाढून २,५५० झाले! २०२५ मध्ये आणखी २० नवे मोठे सिंकहोल तयार झाले आहेत. या अवाढव्य खड्ड्यांमुळे मोठे अपघात होण्याचीही शक्यता आहे. त्यामुळेही लोक हवालदिल झाले आहेत. अर्थातच हे संकट अचानक आलेलं नाही, तर गेल्या २० वर्षांपासून शेतकरी आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ते हळूहळू वाढत गेलं आहे. दुष्काळ आणि भूजल उपसा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. तज्ज्ञांचं म्हणणं आहे, मानवानं स्वतःहून ओढवून घेतलेली ही आपत्ती आहे आणि निष्काळजीपणानं तिला आणखी चालना मिळाली आहे. असं का होतंय, त्याचीही काही शास्त्रीय कारणं आहेत. कोन्या मैदानाची भूवैज्ञानिक रचना 'कार्स्ट' प्रकारची आहे, म्हणजेच हे मैदान कार्बोनेट आणि जिप्समसारख्या विरघळणाऱ्या खडकांपासून बनलेलं आहे. हे खडक हजारो वर्षांमध्ये पाण्यात विरघळून खड्डे तयार करतात. पूर्वी इथे सिंकहोल फारच कमी तयार होत होते, पण जमिनीखालचं पाणी कमी झाल्यानं मैदानाला आधार मिळेनासा झाला आणि ते अचानक कोसळायला लागलं. तुर्कीमध्ये गेल्या १५ वर्षात पाण्याची पातळी सर्वात खालच्या स्तरावर पोहोचली आहे. हवामान बदलामुळे पावसाचं प्रमाण कमी झालं आहे, त्यामुळे जलसाठे पुनर्जिवितच होत नाहीत. कोन्यामध्ये बीट, मका आणि इतर पाणीखाऊ पिकांच्या सिंचनासाठी हजारो वैध आणि अवैध विहिरी चालू आहेत. १९७० च्या दशकापासून काही भागांमध्ये ग्राउंड वॉटर लेव्हल ६० मीटरपर्यंत घसरली आहे. अवैध विहिरी आणि अनियंत्रित पम्पिंगमुळे जमीन कमकुवत झाली आहे. यामुळे तुर्कीमध्ये स्थलांतराची भीतीही प्रचंड प्रमाणात वाढली आहे.

# डॉ.के.एम.वासुदेवन पिल्लई कॅम्पसमध्ये मेकरथॉन ७.० चे यशस्वी आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पिल्लई विद्यापीठाने - अभियांत्रिकी, वास्तुकला, वाणिज्य, डिझाइन आणि व्यवस्थापन यांचा समावेश असलेल्या मेकरथॉन ७.० - विचार करा, शिका, तयार करा या प्रमुख नाविन्यपूर्ण कार्यक्रमाचे डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लई कॅम्पसमध्ये यशस्वी आयोजन केले. मेक इन इंडिया च्या राष्ट्रीय दृष्टिकोनाशी सुसंगत असलेल्या या कार्यक्रमात ठाणे, कल्याण, पनवेल, नवी मुंबई आणि मुंबई येथील संस्थांमधील मार्गदर्शक शिक्षकांनी पाठिंबा देऊन १८९ आंतरशालेय आणि आंतरमहाविद्यालयीन संघांचे १००० हून अधिक विद्यार्थी एकत्र आले.



मेकरथॉन ७.० ने तांत्रिक नवोपक्रम आणि अनुभवात्मक शिक्षणासाठी एक जीवंत, समोरासमोरचा व्यासपीठ प्रदान केले, ज्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक संकल्पनांना वास्तविक जगातील अनुप्रयोगांशी जोडता आले. प्रत्यक्ष समस्या सोडवण्याद्वारे, सहभागींनी गंभीर विचारसरणी, तार्किक निर्णय घेण्याची क्षमता, सर्जनशीलता, संवाद कौशल्ये आणि आत्म-चिंतन बळकट केले - वैयक्तिक आणि व्यावसायिक दोन्ही विकासाला चालना दिली. पिल्लई विद्यापीठाच्या शैक्षणिक तत्वज्ञानाच्या गाभ्यामध्ये अनुभवात्मक शिक्षण आहे. विद्यापीठ करून शिकणे यावर दृढ विश्वास ठेवते, जिथे विद्यार्थी निष्क्रिय वर्ग सूचनांऐवजी वास्तविक जीवनातील आव्हाने, प्रयोग आणि चिंतनात सक्रियपणे सहभागी होतात. शैक्षणिक अनुभवांमध्ये डिझाइन विचारसरणी, प्रोटोटाइपिंग, सांघिक कार्य (टीमवर्क) आणि उद्योग-संबंधित समस्या विधाने एकत्रित करून, पिल्लई विद्यापीठ हे सुनिश्चित करते की शिक्षण कृती-केंद्रित, अर्थपूर्ण आणि वास्तविक जगाच्या अपेक्षांशी सुसंगत आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या वर्कस्टेशन्सवर सक्रियपणे विचारमंथन केले, कल्पनांना कार्यरत नमुनांमध्ये रूपांतरित केले आणि तज्ञ ज्युरींसमोर त्यांचे उपाय सादर केले. सहभागींनी प्रचंड उत्साह व्यक्त केला, मेकरथॉन ७.० द्वारे देण्यात येणाऱ्या सर्जनशीलता, आव्हान आणि प्रेरणा यावर प्रकाश टाकला.


यावेळी अध्यक्ष डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लई यांच्या हस्ते २ लाख रुपयांचे रोख पारितोषिक, ट्रॉफी आणि प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. कार्यक्रमाचा समारोप समारंभातील भाषणात कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट - विचार करा, शिका, निर्माण करा - अनुभवात्मक शिक्षण आणि आत्मविश्वास निर्माण करून विद्यार्थ्यांना सक्षम बनवून यशस्वीरित्या साध्य केले गेले यावर भर देण्यात आला. यामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञान (शाळा) - प्रथम पारितोषिक: सरस्वती माध्यमिक विद्यालय (मराठी), ठाणे, द्वितीय पारितोषिक: सेंट थॉमस अकादमी ऑफ एज्युकेशन, विचुंबे, नवीन पनवेल, तृतीय पारितोषिक: डॉ. पिल्लई ग्लोबल अकादमी, नवीन पनवेल. विज्ञान आणि तंत्रज्ञान (कनिष्ठ महाविद्यालये) - प्रथम पारितोषिक: सी. के. टी. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय, नवीन पनवेल, द्वितीय पारितोषिक: एम्पायरियन स्कूल, खारघर, तृतीय पारितोषिक: सेंट जोसेफ हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेज, कळंबोली. डिझाइन - आर्किटेक्चर आणि इंजिनिअरिंग (शाळा) - प्रथम पारितोषिक: जयपुरियार स्कूल, सानपाडा, दुसरे पारितोषिक: अपीजे स्कूल, नेरुळ, तिसरे पारितोषिक: सेंट लॉरेन्स हायस्कूल, वाशी. डिझाइन - आर्किटेक्चर आणि इंजिनिअरिंग (कनिष्ठ महाविद्यालये) - प्रथम पारितोषिक: न्यू होरायझन पब्लिक स्कूल, न्यू पनवेल, द्वितीय पारितोषिक: सी. के. टी. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय, पनवेल, तृतीय पारितोषिक: सेंट मेरीज ज्युनियर कॉलेज, वाशी. बिझाथॉन (ज्युनियर कॉलेजेस)- प्रथम पारितोषिक: न्यू होरायझन पब्लिक स्कूल, न्यू पनवेल, दुसरे पारितोषिक: डॉ. पिल्लई ग्लोबल अकादमी, न्यू पनवेल, तिसरे पारितोषिक: बाल भारती पब्लिक स्कूल, खारघर, नवी मुंबई.

मेकरथॉन ७.० ने अनुभवात्मक शिक्षणाद्वारे नावीन्यपूर्णता, सहकार्य आणि उद्योगासाठी तयार कौशल्ये जोपासण्याच्या पिल्लई विद्यापीठाच्या वचनबद्धतेची पुष्टी केली.र

## डॉ.होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत कु.प्रांजल प्रकाश ढाकणे अंतिम फेरीत

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील रा जि प तळे मराठी शाळा स्पर्धा परीक्षेसाठी नावा रुपाला आलेली म्हणून ओळख निर्माण झालेली आहे.पुन्हा एकदा या शाळेने स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त केलेले आहे.



विद्यार्थ्यांमध्ये लहानपणा पासूनच विज्ञानाची आवड निर्माण होण्याकरिता डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा परीक्षा घेतली जाते सदर परीक्षेत तळे मराठी शाळेतील कु. अथर्व रवींद्र फडके हा विद्यार्थी परीक्षा उत्तीर्ण झाला असून कु. प्रांजल प्रकाश ढाकणे हिने परीक्षा उत्तीर्ण करून पुढील दुसऱ्या टप्प्यातील प्रात्यक्षिक परीक्षेसाठी पात्र ठरली आहे.

त्यामुळे तळे मराठी येथील मुख्याध्यापिका सौ. सुप्रिया जामकर सुनिल बैकर सौ. मित्तल वावेकर सौ. वर्षा माडी राजू थिटेकर, गोकुळ निकम या सर्व मार्गदर्शक शिक्षकांचे पालक वर्गातून कौतुक होत आहे. या शाळेत नेहमी आपल्या शाळेतील विद्यार्थी हे येणाऱ्या स्पर्धेच्या युगात कसे यश संपादन करतील,यासाठी सदैव प्रयत्नशील असतात.

## वाहनाची काच फोडून रोकड लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील ओरियन मॉलसमोरील सेवा रस्त्याला लागून उभ्या असलेल्या वाहनाची काच फोडून रोकड लंपास केली. या प्रकरणी सुकापूर येथील हॉटेल चालकाने पनवेल शहर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

पनवेलमध्ये हॉटेलबाहेर उभ्या केलेल्या मोटारींच्या काचा फोडून रोकड व इतर महागड्या वस्तू चोरांनी पळवल्या आहेत. कॅफेचालक तरुणाला रात्री तीन वाजता मोटारीच्या मागील दरवाजाची काच फोडून एक लाख रुपयांची रोकड आणि ओळखपत्र चोरले.

# महसूल कर्मचारी आंदोलनाच्या पावित्र्यात

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महसूल मंत्री यांनी कोणतीही पुर्व सुचना न देता, विना चौकशी चार तहसीलदार, चार मंडळ अधिकारी, व दोन ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांच्याविरोधात निलंबनाची कारवाई केली. भंडारा येथील तत्कालीन उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्यांविरोधात फौजदारी कारवाई करणे, पालघरमधील मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांचेदेखील अन्यायकारक निलंबन करणे अशा अनेक कारणामुळे महसूल अधिकारी व कर्मचारी वर्गात नाराजीचे सुर उमटले आहेत. त्यांच्या विरोधात रायगड जिल्ह्यातील महसूल अधिकारी व कर्मचारी एकवटले आहेत.

महाराष्ट्र राज्य महसूल अधिकारी व कर्मचारी समन्वय महासंघ रायगड जिल्ह्याच्यावतीने बुधवारी सायंकाळी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात आले आहे. शुक्रवारपासून (दि. १९) बेमुदत काम बंद आंदोलन करण्याचा इशारा या निवेदनातून देण्यात आला आहे.

विधी मंडळातील व विधीमंडळा बाहेरील विनाचौकशी निलंबन सत्र आणि नैसर्गिक न्यायाची पायमल्ली करण्यात आल्याचा आरोप संघटनेच्यावतीने करण्यात आला आहे. महसूलमंत्री यांनी एकतर्फी निलंबनाची कारवाई केली आहे. गौणखनिज कारवाई आणि प्रशासकीय कोंडी होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

अवैध गौण खनिज करणाऱ्या गुन्हेगाराचा पाठलाग करणे, हे महसूलविभागाला शक्य नाही. फक्त दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार आहेत. तरीदखील महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून कार्यवाही करणे अन्यायकारक आहे.

महसूलमंत्री यांनी एका वर्षात २८ नायब तहसीलदार, तहसीलदार, चार उपजिल्हाधिकारी, आठ मंडळ अधिकारी, १४ ग्राम महसूल अधिकारी, सहाय्यक महसूल अधिकारी, व महसूल सहाय्यक यांच्याविरोधात निलंबनाची केलीली कारवाई अन्यायकारक आहे.

त्यामुळे महसूल मंत्र्याचा निषेध व्यक्त करीत या विरोधात महसूल अधिकारी व कर्मचारी यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. रायगड जिल्ह्यातील उपजिल्हाधिकारी, तहसीलदार व अन्य अधिकारी व कर्मचारी यांनी जिल्हाधिकारी किशन जावळे यांची भेट घेतली. त्यांना निवेदन देत १९ डिसेंबरपासून प्रलंबित प्रश्नांसाठी बेमूदत काम बंद आंदोलन केले जाणार असल्याचा शारि दिला.

## ग्रुप ग्रामपंचायत वऱ्हाड-जांभूळपाडा येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत विविध विकासकामांना गती

**दै.रायगड नगरी । अमित गायकवाड**

**पाली/वाघोशी ।** ग्रुप ग्रामपंचायत वऱ्हाड-जांभूळपाडा येथे राज्य शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत मुख्य घटक आठकावर प्रभावीपणे काम सुरू आहे. या अभियानाच्या माध्यमातून ग्रामस्थांच्या दैनंदिन गरजा आणि मूलभूत सुविधांवर भर देत विविध विकासकामे राबविण्यात येत आहेत.

या अंतर्गत शुद्ध पाणीपुरवठा व्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, ग्रामपंचायत वेबसाईटची उभारणी, स्मशानभूमीमध्ये सर्व आवश्यक सुविधा, तसेच धार्मिक स्थळांचे सुशोभीकरण करण्यात येत आहे. यासोबतच ग्रामस्थांसाठी आयुष्यमान भारत कार्ड शिबिरांचे आयोजन, वनराई बंधाऱ्यांची उभारणी, स्वच्छता अभियान, तसेच ग्रामपंचायतीमार्फत सर्व सेवा ऑनलाइन स्वरूपात उपलब्ध करून देणे यावर विशेष लक्ष दिले जात आहे. याशिवाय ग्रामपंचायतीच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण उपक्रम देखील राबविण्यात येत असून, त्यामुळे ग्रामविकासाला चालना मिळत आहे. या सर्व विकासकामांसाठी सरपंच श्री. पांडुरंग लिंबाजी शेंडे, उपसरपंच सौ. अरुणा गिरीश दळवी, सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामपंचायत अधिकारी श्री. सचिन बालाजी केंद्रे यांचे विशेष सहकार्य लाभत आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामुळे वऱ्हाड-जांभूळपाडा ग्रामपंचायत क्षेत्रात सर्वांगीण विकास होत असून, ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# ग्रामसखी आकांक्षा सुतार यांची आत्मनिर्भरतेकडे यशस्वी वाटचाल



**दै.रायगड नगरी । निलेश लोखंडे**

**महाड ।** उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत बिरवाडी प्रभागातील ग्रामपंचायत वाळण खुर्द येथील ग्रामसखी (प्रेरिका) श्रीम. आकांक्षा सुतार यांनी स्वतःची उस रसवंती सुरू करून महिलांसाठी आत्मनिर्भरतेचा प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. महाड येथील परिवार दुकान समोर त्यांनी सुरू केलेल्या या उपजीविकेमुळे स्वावलंबनाची नवी दिशा उघडली आहे.

श्रीम. आकांक्षा सुतार यांच्या मेहनत, धाडस आणि आत्मविश्वासातून अनेक महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची प्रेरणा मिळणार आहे. स्वतः उभे राहा आणि इतरांना उभे राहण्याची ताकद द्या हा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून प्रभावीपणे दिला आहे.

या उपक्रमाच्या प्रसंगी मा. तालुका अभियान व्यवस्थापक संचित पार्टे, प्रभाग समन्वयक - बिरवाडी श्रीम. मनाली शिगवण व प्रभाग समन्व्यक - वरंध श्रीम. दर्शना श्रीवर्धनकर यांनी उपस्थित राहून श्रीम. आकांक्षा सुतार यांचे अभिनंदन केले व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

श्रीम. आकांक्षा सुतार यांची ही यशस्वी वाटचाल निश्चितच अनेक महिलांसाठी उज्ज्वल भविष्यास कारणीभूत ठरणारी आहे.

## वाहनाखाली चिरडून दुचाकीस्वाराचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात वाहनाने मोटारसायकलला धडक दिल्याने खाली पडलेल्या दुचाकीस्वाराच्या अंगावरून वाहन गेल्याने त्याचा चिरडून मृत्यू झाल्याची घटना घडली.

मोहम्मद हरून इमाम अली असे त्यांचे नाव आहे. बरकत अली चौधरी याने त्याचा मित्र सत्यप्रकाश याला मॅरेथॉन पळस्पे फाटा येथे सोडल्यानंतर मोहम्मद हरून याला फोन केला असता, फोन उचलणाऱ्या दुसऱ्या व्यक्तीने मोहम्मद हरून इमाम अली हा त्याच्या दुचाकीने जात मुंबई-पुणे महामागांवरून असताना अज्ञात वाहनाने त्याच्या मोटारसायकलला धडक दिल्याने झालेल्या अपघातात त्याचा मृत्यू झाल्याचे सांगितले. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# ई-पीकपाणी नोंद ऑफ लाईन पद्धतीने : मुरुड तालुका आगरी समाज शेतकरी प्रबोधिनीच्या प्रयत्नांना यश

**दै.रायगड नगरी । राजीव नेवासेकर**

**कोर्लई ।** यंदा पडलेल्या परतीच्या पावसामुळे मुरुड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या भातपीकाचे अतोनात नुकसान झाले असून त्यातच शासनाचे ई-पीकपाणी नोंद करण्यात नेटवर्क मिळत नसल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांना ई-पीकपाणी नोंद करण्यात मुदत वाढवून द्यावी किंवा शासन धोरण शिथिल करण्यात यावे. अशी मागणी मुरुड तालुका आगरी समाज शेतकरी प्रबोधिनी तर्फे अध्यक्ष ॲड.विनायक शेडगे यांनी आपल्या सहकारी शेतकरी बांधवांसमवेत तहसीलदार आदेश डफळ यांना एका निवेदनाद्वारे करण्यात येऊन वेळप्रसंगी याविरोधात तहसील कार्यालयासमोर उपोषणाला बसणार.असा इशारा देण्यात आला होता.

सदर मागणीची दखल घेऊन शासनाने ई -पीकपाणी नोंद ऑफ लाईन पद्धतीने करण्यात आदेश देण्यात आल्याबद्दल मुरुड तालुका आगरी समाज शेतकरी प्रबोधिनी आणि शेतकरी बांधवांच्या वतीने तालुका अध्यक्ष ॲड.विनायक शेडगे यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत तहसीलदार आदेश डफळ यांना एक पत्र देऊन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सचिव, जिल्हाधिकारी -रायगड, तहसीलदार यांचे आभार मानले आहेत.

सन २०२५-२६ या वर्षाची शेतकऱ्यांच्या नावाने ई-पिक पाणी नोंद नसल्याने वर्षभराचे मेहनतीचे नुकसान होणार होते, त्या करीता सरकारने मुरुड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या नावाने पिकपाणी नोंद ७÷१२ वर करावी या करीता आंदोलन करण्यात आले होते. सदर अर्जाची महाराष्ट्र शासनाने दखल घेवून सदर शेतक-यांचे पिकपाणी नोंद ऑफ लाईन पद्धतीने करून घ्यावी.असे आदेश पारीत केले,शेतकरी संघटनेच्या संघर्षाला यश आले.त्यामुळे शेतकरी बांधवात आनंदाचे वातावरण आहे.

आजही मुरुड तालुक्यातील काही शेतकरी ज्या शेत जमिनी पिढ्यान पिढ्या कसतात त्या जमिनिवर कुळ, आहेत, काही जमिनीवर कुळ तर काही जमिनी फक्त शेकडो वर्षापासुन शेतकऱ्यांच्या ताबे कुळात आहेत परंतू ते अजुनही मालक नाहीत.तरी कसत असलेल्या जामीनीची चौकशी करून त्यांना कुळ बनविण्यात यावे व कुळ असलेल्या शेतक-यांना मालक बनविण्यात योग्य ते आदेश देण्यात यावेत.अशी विनंती वजा मागणी आगरी समाज शेतकरी प्रबोधिनीतर्फे करण्यात आली आहे.

यावेळी आगरी समाज शेतकरी प्रबोधिनीचे तालुका अध्यक्ष ॲड. विनायक शेडगे, अनंत शेळके, संदीप गोणबरे, अविनाश शिंदे, मिथुन चोर्ढेकर उपस्थित होते.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# ई-शॉप वाहन खरेदीत घोटाळा?

## रायगड जिल्हा परिषदेमधील गैरप्रकाराची चर्चा जोरात

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्हा परिषदेतील कर्मचारी वेतन फरकातील आर्थिक घोटाळ्यानंतर आता दिव्यांगासह मागासवर्गीय बचत गट व महिला बचतगटांच्या ई शॉप वाहन खरेदीतील घोटाळा समोर आला आहे.

दीड लाख रुपयांत मिळणारी वस्तू साडेतीन लाख रुपयांत खरेदी केल्याने गैरप्रकाराची चर्चा सध्या जोरात सुरू आहे. त्यामुळे या प्रकरणात आणखी काही अधिकारी व कर्मचारी अडचणीत सापडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील दिव्यांगांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे, त्यांच्यामध्ये व्यावसायिक दृष्टीकोन निर्माण व्हावा यासाठी रायगड जिल्हा परिषदेने पुढाकार घेत दिव्यांग बांधव, मागासवर्गीय बचतगट, महिला बचतगटांच्या सक्षमीकरणासाठी १५६ ई-शॉप वाहन दिले होते. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून दिव्यांग बांधव, मागासवर्गीय बचतगट, महिला बचतगटांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना, उपक्रम राबविण्यात येतात. याचाच एक भाग म्हणून दिव्यांग बांधव, मागासवर्गीय बचतगट, महिला बचतगटांना रोजगार करता यावा यासाठी ई-शॉप वाहन ही योजना मागील वर्षी हाती घेण्यात आली होती.

जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण तसेच महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून ही योजना राबविण्यात आली होती. योजनेंतर्गत दिव्यांग व्यक्ती ७१, मागासवर्गीय बचतगट २८, महिला बचतगट ५७ लाभार्थ्यांना ई-शॉप वाहने देण्यात आली. पर्यावरणस्नेही ई-शॉप वाहन प्रत्येकी सुमारे ३ लाख ५० हजार रुपयांनी खरेदी करण्यात आले होते. यासाठी सुमारे साडेपाच कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला.

वाहनातील अंतर्गत भागात व्यवसायाच्या दृष्टीने डिझाइन करण्यात आले होते. सर्व विभागांचा ५ टक्के निधी दिव्यांगांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार या निधीतून दिव्यांग बांधवांच्या सक्षमीकरणासाठी त्यांना व्यवसाय करता यावा यासाठी ई-शॉप वाहन देण्याचे निश्चित केले होते. तसेच महिला बचतगटांच्या सक्षमीकरणासाठी ई-शॉप वाहन देण्यात आले होते.

मात्र, ई-शॉप वाहन खरेदीत घोटाळा झाला असून योग्य लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला नसल्याचे काही संघटनांनी आरोप केला आहे. त्यामुळे काही अधिकारी व कर्मचारी मोठ्या अडचणीत सापडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.


### जाहीर नोटीस

तमाम लोकास या नोटीसीद्वारे जाहिर सुचना देण्यात येते की, १. टेरेन्स झुज्या आलवरिस २. सुगंधा गील्बर्ट आल्वारीस सर्व राहणार : कोंबडभुजे, पोस्ट उलवे ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६, यांना सिडको लि, कडून मौजे नोड पुष्पक वहाळ, येथील फाईल नं KOM-ICOGS-370A प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भुखंडांचे वाटप झालेले आहे. सदर भुखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादित जमिनीच्या मोबदल्यात साडेबाबीस टक्के योजने अंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबई, कडून खालीलप्रमाणे पात्रता मंजुर होऊन करारनामा होऊन हस्तांतरण झाले आहे. वर नमूद भूखंडधारकाकडून भुखंड क्र. १८३, सेक्टर २५, क्षेत्र ७०० चौ. मी पैकी १. टेरेन्स झुज्या आलवरिस २ सुगंधा गील्बर्ट आल्वारीस यांचा २५ टक्के अविभाज्य भाग व में हेजल ॲंड नव्या इन्फ्रा एलएलपी यांचा ७५ टक्के अविभाज्य भाग असा आहे त्यापैकी माझे अशिल में हेजल ॲंड नव्या इन्फ्रा एलएलपी तर्फे भागीदार १. श्री विजय भवानजी पटेल २. दीनानाथ एस मिश्रा पत्ता : शॉप नं १ व ५, नीलकंठ ऑरा, सेक्टर २३, प्लॉट नं. १९८ सी, उलवे नवी मुंबई, ४१०२०६ यांनी १. टेरेन्स झुज्या आलवरिस २. सुगंधा गील्बर्ट आल्वारीस यांचा खाली वर्णन केलेला भूखंडापैकी त्यांच्या हिस्स्याच्या राहिलेले २५ टक्के अविभाज्य भाग त्रिपक्षीय करारनामा / हस्तांतरण व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशील**
**सिडको फाईल क्रमांक** KOM-ICOGS-370A

| नोड | सेक्टर | प्लॉट क्रं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक वहाळ | २५ | १८३ | ७०० चौ. मी पैकी त्यांच्या हिस्स्याच्या राहिलेले २५ टक्के अविभाज्य भाग |

वर वर्णन केलेल्या मिळकती मध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी त्यानंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुषीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सुचना प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

दि.१८/१२/२०२५

**सही/-**
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**शॉप नं.४५, पहिला मजला,**
**क्रिस्टल प्लाझा, सेक्टर ७, हिरानंदानी,**
**खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**



मा.राणे साहेब यांचे कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
ॲड. निलम लक्ष्मण पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधीश क.स्तर सो पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१५५७/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.१७/०१/२०२६

कु. ऐरिन मेंडोसा
वय- २८ वर्षे, धंदा- नोकरी,
राहणार : खत्री मेंशन, दुसरा मजला,
रुम नं १, डॉ आंबेडकर रोड,
परेल, मुंबई ४०००१२. अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही सामनेवाले

सदर अर्जदार यांची आई सुकरीन मेंडोसा उर्फ डिसिल्वा या ता. १९/०१/२०२२ रोजी मुंबई येथे मयत झालेल्या आहेत. तसेच अर्जदार यांचे वडील ऑब्री थॉमस मेंडोसा हे ता. ०७/११/२०१३ रोजी खत्री मेंशन, दुसरा मजला, रुम नं १, डॉ आंबेडकर रोड, परेल, मुंबई येथे मयत झालेले आहेत. मयत सुकरीन मेंडोसा उर्फ डिसिल्वा यांनी दि. ०८/०६/१९९३ रोजीच्या 'ॲग्रीमेंट फॉर सेल' या कराराने मौजे : नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथिल खालीलप्रमाणे वर्णन केलेली सदनिका खरेदी केलेली आहे.

**सदनिकेचे वर्णन**

मौजे- नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथिल

साईप्रसाद को-ऑप. हौसिंग सोसायटी, नविन पनवेल, या इमारतीमधील ई-५/०:३, क्षेत्र- ५०२७५ चौ. फुट

वर नमूद सदनिका मयत सुकरीन मेंडोसा उर्फ डिसिल्वा यांच्या मृत्यूपश्चात अर्जदारांचे नावे होण्याकरीता अर्जदारांनी संबंधीत कार्यालयात चौकशी केली असता त्यांस सक्षम कोर्टातून मयतांचा वारस दखला आणण्याकरीता सांगीतले. सबब सदर अर्जदारांनी ते मयत सुकरीन मेंडोसा उर्फ डिसिल्वा यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता मे. कोर्टात अर्ज केला आहे..

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणी प्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानीशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे. कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.११ माहे १२/२०२५ रोजी माझ्या सहीने व मे. कोर्टाचे शिक्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**



### PUBLIC NOTICE

notice is hereby given that the documents Bearing original, 1) ALLOTMENT LETTER and POSSESSION LETTER Executed by KHARADE DILIP VASANT under September 1991 scheme for government servants, 2) SALE DEED Executed between KHARADE DILIP VASANT AND VIMAL RAMESH CHAVAN ON DATED 5TH MAY 1996 receipt no 2174/96 3) CIDCO FINAL ORDER BETWEEN KHARADE DILIP VASANT AND VIMAL RAMESH CHAVAN ON DATED 6TH DEC 1996 Ref no CIDCO/EMS/EO/KLM/597 4) CIDCO FINAL ORDER BETWEEN VIMAL RAMESH CHAVAN AND SHANTARAM JAGTAP has been misplaced and not traceable yet.

If found kindly inform to ADV. MANJIT KAUR SANDHU at gurusankalp co- op housing ,shop no 12 , kalamboli 410218

**Description of lost/ misplaced original documents**

All the piece and parcel OF land situated at LIG II/B-38, SECTOR -1 KALAMBOLI, ( NAVI MUMBAI), TAL PANVEL, DIST RAIGAD.

Any person who finds the said title documents should intimate to the undersigned & if any person, bank, financial institution having any claim or right in respect of the said property by way of inheritance, share, sale, mortgage, lease, lien, license, gift, possession or encumbrance howsoever or otherwise or having above documents is hereby called upon to intimate to the undersigned within 15 days from the date of publication of this notice of his such claim &the claims, if any of such person shall be treated as waived & not binding on our clients.

Date : 18/12/2025

**Sd/-**
**ADV. MANJIT KAUR SANDHU**
**7738900770**



### जाहीर नोटीस

तमाम लोकास या नोटीसीद्वारे जाहिर सुचना देण्यात येते की, १) श्री. भालचंद्र बापू उर्फ बाबू वास्कर २) सौ ताईबाई बापू उर्फ बाबू वास्कर उर्फ संगिता शंकर कोळी ३) सौ. शांताबाई बापू उर्फ बाबू वास्कर उर्फ शांता मंगेश कोळी ४) सौ. शोभाबाई बापू उर्फ बाबू वास्कर उर्फ शोभा गणेश पगडे ५) श्री गोरख सत्यवान वास्कर ६) श्रीमती आनंदीबाई धनाजी वास्कर ७) श्री. सचिन धनाजी वास्कर ८) श्री. संदिप धनाजी वास्कर ९) श्रीमती सारिका सुरेश भोईर १०) श्री. कैलास गजानन भोईर ११) कुमारी. श्रावणी कैलास भोईर (अज्ञान) पालनकर्ता १२) कुमारी वैशाली सत्यवान वास्कर १३) कु. विशाखा सत्यवान वास्कर, राहणार : घर क्र. १२३ ब, ओवे पेठ, सेक्टर ३२, खारघर, ४१०२१०, यांना सिडको लि, कडून मौजे नोड तळोजा येथील फाईल नं ९५७प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भुखंडांचे वाटप झालेले आहे. सदर भुखंड हे वर उल्लेख केलेले शेतक-यांच्या संपादित जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजने अंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबई, कडून खालीलप्रमाणे पात्रता मंजुर होऊन त्याप्रमाणे सदर भूखंडाचा करारनामा झाले आहे. त्याप्रमाणे माझे अशिल मे एस एस डेव्हलपर्स तर्फ भागीदार १) श्री. पुजा सत्यवान पाटील, राहणार : घर क्र. ३१०, मौजे तोंडरे वावंजे, रायगड, ४१०२०८ २) श्री. रोनित सचिन वास्कर, राहणार : घर क. १२३ व, ओवे पेठ, सेक्टर ३२, खारघर, ४१०२१० यांनी खालील वर्णन केलेला भुखंड त्रिपक्षीय करारनामा, विकासकरारनामा , हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशील**
**सिडको फाईल क्रमांक ९५७ तळोजा नोड**

| नोड | सेक्टर | भूखंड क्रं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| तळोजा | २३ | ९१ | ३९९.७५ चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकती मध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी त्यानंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुषीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल सदर सुचना प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

दि.१८/१२/२०२५

**सही/-**
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**शॉप नं.४५, पहिला मजला,**
**क्रिस्टल प्लाझा, सेक्टर ७, हिरानंदानी,**
**खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**


# मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीत ७ कोटी ९४ लाख रुपयांची रक्कम वसूल

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत (दि.१३ डिसेंबर २०२५) रोजी आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जिल्हा परिषद रायगड अंतर्गत ग्रामपंचायतींनी सक्रिय सहभाग नोंदविला. या लोक अदालतीच्या माध्यमातून घरपट्टी व पाणीपट्टी मिळून एकूण ३४ हजार ०३० प्रकरणे लोक अदालतीत ठेवण्यात आली होती. त्यापैकी ९ हजार ७९० प्रकरणांमधून एकूण रुपये ७ कोटी ९४ लाख ५६ हजार ५१३ इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

या लोक अदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील ग्रामपंचायतींकडून घरपट्टीची एकूण २७ हजार ३४१ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ८ हजार ३१६ प्रकरणांमधून रुपये ६ कोटी ८० लाख १४ हजार ९६३ इतकी घरपट्टी वसुल करण्यात आली. तसेच पाणीपट्टीची ६ हजार ६८९ प्रकरणे लोक अदालतीत ठेवण्यात आली असून त्यापैकी १ हजार ४७४ प्रकरणांमधून रुपये १ कोटी १४ लाख ४१ हजार ५५० इतकी पाणीपट्टी वसूल करण्यात आली आहे.

अशा प्रकारे घरपट्टी व पाणीपट्टी मिळून एकूण ३४ हजार ०३० प्रकरणे लोक अदालतीत ठेवण्यात आली होती. त्यापैकी ९ हजार ७९० प्रकरणांमधून एकूण रुपये ७ कोटी ९४ लाख ५६ हजार ५१३ इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या माध्यमातून ग्रामपंचायतींची आर्थिक स्वयंपूर्णता, महसूलवाढ व प्रशासकीय कार्यक्षमता वाढीस मदत होत असून, अशा उपक्रमांमुळे ग्रामीण विकासाला गती मिळत आहे. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी शासनाच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा तसेच उर्वरित रहिवाश्यांनी पाणीपट्टी, घरपट्टी भरणा करण्यात यावी असे आवाहन ग्रामपंचायत विभागामार्फत करण्यात येत आहे.


### जाहीर नोटीस

तमाम लोकास या नोटीसीद्वारे जाहिर सुचना देण्यात येते की, श्री. उंदऱ्या गणु भोईर राहणार : चाळ, पो. वावंजे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, ४१०२१० यांना सिडको लि, कडून मौजे नोड तळोजा येथील फाईल नं. ४२३ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भुखंडांचे वाटप झालेले आहे. सदर भुखंड हे वर उल्लेख केलेले शेतकऱ्यांच्या संपादित जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजने अंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबई, कडून खालीलप्रमाणे पात्रता मंजुर होऊन त्याप्रमाणे सदर भूखंडाचा करारनामा झाला आहे. त्याप्रमाणे माझे अशिल मे. अमान डेव्हलपर्स तर्फे भागीदार १. जुबेर इसाक ख्वाजा २. सिराजुल इस्लाम शेख राहणार : ख्वाजा हाऊस, प्लॉट नं. २३ए, सेक्टर ३५ ई, खारघर, नवी मुंबई, ४१०२१० यांनी खालील वर्णन केलेला भूखंड त्रिपक्षीय करारनामा, विकासकरारनामा, हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशील**
**सिडको फाईल नं.४२३, नोड तळोजा**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्रं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| तळोजा | १७ | ६३ | ५०.०० चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकती मध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, वक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी त्यानंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुषीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सुचना प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

दि.१८/१२/२०२५

**सही/-**
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**शॉप नं.४५, पहिला मजला,**
**क्रिस्टल प्लाझा, सेक्टर ७, हिरानंदानी,**
**खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**



Hon'ble Rathod Madam

Adv.Anagha R. Powale
Mob No.9770765555

### PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE (J.D) PANVEL, AT PANVEL
MISC.APPLICATION NO. 1196/2025
Exh No.8/D
N.D. 20/12/2025

MRS. PARVATI SHANKAR DESAI
Age-62years, Occ. Service, Indian Inhabitant
Residing at:- KL-6/A/2, Flat No. 11,
Panchvati Co-op Hsg Society Ltd. Sec-1,
Kalamboli Highway, Kalamboli, Panvel,
Raigad-400218.
MR. GANESH SHANKAR DESAI
Age -44 year, Occ. Service, Indian Inhabitant
Residing at: KL-6/A/2 Flat No. 11, Panchvati
Co-op Hsg Society Ltd Sec-1,
Kalamboli Highway. Kalamboli, Panvel,
Raigad -400218 Applicant

Versus

MRS. SMITA SHANKAR DESAI
Age - year, Occ. Service, Indian Inhabitant
Residing at: KL-6/A/2 w/o pavan sikchi
Flat No.11, Panchvati Co-op Hsg Society Ltd
Sec-1, Kalamboli Highway, Kalamboli,
Panvel, Raigad -400218 Respondents

WHEREAS the Applicants above named has filed an application before this Court for grant of Heirship Certificate in respect of the immovable property, more particularly described in the Schedule hereunder, left by the deceased MR. SHANKAR JAGANNATH DESAI, who died intestate on 11TH november 2023

AND WHEREAS if any person/s has/have any right, title, interest or share of any nature whatsoever if/are hereby invited to submit his/her/their objection/ Claim in this Court within the period of 30 days from the date of the publication of this public notice.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

KL6(A) Flat No. 11, Building No.2, Panchavati Co-operative Housing Society Ltd, Sector- 1, Condominium No. 26, Kalamboli, Panvel admeasuring about 581 Sqft. Carpet area, left the SHARE 50% & Dist.-Thane and within the limits of Sub-Registrar of Vashi/Thane and Registration District, Thane.

As such if nothing is received within the period of 30 days from the date of the publication of the public notice, the application of the Applicant shall be allowed and the Heirship Certificate, as prayed for shall be granted to Applicants.

Given under our hand and seal on this 17 day of 12/2025

**Sd/-** **Jr.Clerk** **Civil Court J.D.** **Panvel** | **Court Seal** | **Sd/-** **Asst.Supted.** **Civil Court J.D.** **Panvel**


# डोळ्यांत मिरची पावडर टाकली : तरुणीवर गुन्हा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

३२ वर्षीय तरुणाच्या डोळ्यांत मिरची पावडर टाकणाऱ्या तरुणीविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

३२ वर्षीय तरुण तक्का येथे राहत असून, २०२० मध्ये त्याची ओळख एका तरुणीसोबत झाली आणि त्याचे रूपांतर प्रेमसंबंधात झाले. मात्र, त्यांच्यात वाद होत असल्याने २०२३ मध्ये तरुणीने ३२ वर्षीय तरुणावर बलात्काराचा गुन्हा दाखल केला. या गुन्ह्यात तरुण जामिनावर आहे. पनवेल रेल्वे स्टेशन येथे तो आला असताना बस डेपोच्या मागे वडील व भावासोबत आलेल्या या तरुणीने त्याच्या डोळ्यांत आणि तोंडावर मिरची पावडर टाकली. या प्रक्रणी पोलिसांनी या तरुणी विरोधात गुन्हा नोंद केला आहे.


अर्जदारातर्फे वकील
सौ. निलम लक्ष्मण पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१५५४/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.०२/०२/२०२६

१. श्री मंगेश सुरेश पाटील
वय ३५ वर्षे, धंदा नोकरी,
रा- कुंडेगाव, जे.एन.पी.टी उरण, ता.उरण, जि.रायगड
२. सौ. विनंती सुरेश पाटील
वय ३४ वर्षे, धंदा गृहिणी,
रा-मु. कुंडेगाव, जे.एन.पी.टी उरण, ता.उरण, जि.रायगड
३. सौ. पुजा निलेश कोळी
वय ३३ वर्षे, धंदा गृहिणी,
रा-मु. मोहा, पो.उलवे, ता. पनवेल, जि.रायगड अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही सामनेवाले

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार नं १ ते ३ हे एकमेकांचे सख्खे भाऊ-बहिण आहेत. अर्जदार नं. १ ते ३ यांचे वडिल सुरेश कोळश्या उर्फ कोळशा पाटील हे दि. ३०/१२/२०१९ रोजी मौजे कुंडेगाव, पो-जे.एन.पी.टी, ता. उरण येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं. १ ते ३ यांची आई यशोदा सुरेश पाटील या दि. ३०/०४/२०१८ रोजी मौजे-कुंडेगाव, पो-जे.एन.पी.टी, ता. उरण येथे मयत झालेले आहेत तसेच कै. सुरेश कोळशा उर्फ कोळशा पाटील यांची आई बामुबाई कोळशा पाटील यादेखील मयत झालेल्या आहेत. सदर मयत सुरेश कोळश्या उर्फ कोळशा पाटील यांच्या सामाईक मालकीच्या मौजे पागोटे व नवघर, ता. उरण, जि. रायगड येथिल जमिन मिळकती महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड यांनी नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादित केल्या आहेत. सदर मिळकतींच्या संपादनासंबंधी खालीलप्रमाणे ॲवॉर्ड जाहीर करण्यात आले आहे.

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पागोटे व नवघर, ता.उरण, जि. रायगड येथिल**

| अ.क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | पागोटे २५९ | ५७ | २ | ०-१५-० | २.१९ |
| | | ६१ | ५ अ | ०-२२-४ | २.८८ |
| | | ८४ | २ | ०-१२-८ | १.८१ |
| २ | नवघर १८७/८५ | १६१ | १ | ०-५-७ | ०.६९ |
| | | १७९ | ४ बी | ०-१४-५ | २.०७ |
| | | १८१ | ४ | ०-१४-० | १.९९ |
| | | १९३ | ७ | ०-१५-९ | १.५० |
| | | १९७ | ८ | ०-९-० | १.३१ |
| | | २०९ | ५ | ०-१८-० | २.४४ |
| | | २१५ | १ | ०-९-९ | १.१२ |
| | | २२३ | २ | ०-१६-६ | २.३१ |
| | | २२३ | ८ | ०-१७-५ | २.२५ |
| | | २३३ | ६ | ०-६-३ | ०.८७ |
| | | २८१ | १० | ०-२-५ | ०.३७ |

२. वर नमूद संपादीत मिळकतींचे संपादनापोटी अर्जदार व त्यांचे इतर सहहिस्सेदारांस मौजे द्रोणागिरी, ता. उरण येथिल सेक्टर-६५ मधील भुखंड क्र. ५, हा १५५० चौ.मी. क्षेत्राचा भुखंड वाटप करण्यात आलेले आहे.

आता शासनाने जाहीर केलेल्या साडेबारा टक्के भुखंड योजनेअंतर्गत सदर मयत सुरेश कोळश्या उर्फ कोळशा पाटील यांस त्यांच्या वरील मिळकतीचे संपादनापोटी मिळणारे भूखंड सदर अर्जदारांस मिळणेकरिता त्यांनी ते मयत सुरेश कोळश्या उर्फ कोळशा पाटील यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता मे. कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणी प्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानीशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे. कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१७ माहे १२ सन २०२५ रोजी माझ्या सहीने व मे. कोर्टाचे शिक्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

### काल श्रीवर्धन शहरात झालेल्या भीषण अपघातानंतर देखील...

# फोरकोन कंपनीची दगड वाहतूक सुरुच, ३१ डिसेंबर पर्यंत वाहतूक बंद ठेवावी

**दै.रायगड नगरी । संतोष चौकर**

**श्रीवर्धन ।** काल पुणे येथून आलेल्या अल्पवयीन पर्यटकांकडून श्रीवर्धन मधील एक व्यावसायिक परवेज हमदुले यांचा मृत्यू झाला होता. सदरची थार गाडी चालवणारा तरुण हा सतरा वर्षाचा असल्याची विश्वसनीय माहिती समोर आली आहे. जर का गाडी चालवणारा मुलगा अल्पवयीन असेल, त्याच्याकडे वाहन चालवण्याचा परवाना नसेल तर, ज्या व्यक्तींनी त्याच्या हातात गाडी दिली. त्या व्यक्तीवर गुन्हा दाखल होणे आवश्यक आहे. काळ्या रंगाची थार एम. एच. १२ व्ही. डब्ल्यू. ८०५५ ज्या व्यक्तीच्या नावावर आहे. त्याच्यावरती श्रीवर्धन पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता आहे.

गेल्या वर्षी देखील हरिहरेश्वर येथे एका युवतीला स्कॉर्पिओ गाडी गाडीखाली चिरडून काही पर्यटक पळून गेले होते. पुण्यातून येणाऱ्या पर्यटकांचा मद्यपीपणा व उन्मत्तपणा पुन्हा एकदा श्रीवर्धनच्या घटनेवरून दिसून आला आहे. सदरचे पर्यटक हे श्रीवर्धन येथे दोन दिवस वास्तव्यास होते व ज्या ठिकाणी त्यांचे वास्तव्य होते त्या ठिकाणी देखील त्यांनी दारू पिऊन खूप मोठ्या प्रमाणात धिंगाणा घातल्याचे बोलले जाते. काल बुधवार असल्यामुळे सुट्टीचा दिवस नव्हता. समुद्रकिनारी जाणाऱ्या रस्त्यावरती गर्दी कमी होती.

परंतु सध्या पार्किंगची व्यवस्था नसल्यामुळे श्रीवर्धन शहरातील प्रत्येक पाखाड्यांमध्ये येणारे पर्यटक आपल्या गाड्या वेड्यावाकड्या उभ्या करून ठेवतात. श्रीवर्धन शहरात प्रवेश करताना श्रीवर्धन नगरपरिषद पर्यटन कर घेते. मात्र या पर्यटन कराच्या मोबदल्यात पर्यटकांना पार्किंगची सुविधा उपलब्ध करून दिली जात नाही. श्रीवर्धन नगरपरिषदेने तसेच श्रीवर्धनच्या आमदार व महिला व बालविकास




मंत्री अदिती तटकरे यांनी श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर हेलीपॅड च्या बाजूला असलेली वनखात्याच्या अखत्यारित असलेली जागा पार्किंगसाठी लवकरात लवकर उपलब्ध करून द्यावी.

जेणेकरून श्रीवर्धन मधील पार्किंग समस्येचे निराकरण होईल. श्रीवर्धन शहरातील जीवना पार, विठ्ठल आळी, नारायण पाखाडी, चौकर पाखाडी, दांडा मार्गे फोरकोन कंपनीचे डंपर मोठमोठे दगड घेऊन वाहतूक करत असतात. या अवजड वाहतुकीमुळे श्रीवर्धन शहरातील रस्त्यांची दुर्दशा झाली आहे.

अनेक ठिकाणी पिचिंग तुटून गेली आहेत. तर या डंपर्समुळे अनेक वेळा वाहतूक कोंडी देखील झालेली पाहायला मिळते. तालुक्यात ओव्हरलोड वाहतूक करणारे बॉक्साइडचे डंपर व दगडाची वाहतूक करणारे डंपर यांच्यावर प्रादेशिक परिवहन विभागाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

मद्यपान करून रस्त्याच्या उजव्या बाजूने जोरामध्ये गाडी हाकून एका तरुणाच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या युवकांना शिक्षा होणे गरजेचे आहे. तसेच पुणे येथून येणाऱ्या पर्यटकांच्या गाड्या एम. एच. १२ व एम. एच. १४ यांच्या चालकांची श्रीवर्धन शहरात शिरतानाच मद्यपान केले आहे का? याबाबत तपासणी करण्यात यावी. त्यासाठी रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी श्रीवर्धन साठी विशेष पथक नेमण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. नाहीतर श्रीवर्धन मधील निष्पाप नागरिकांना अशाच प्रकारे बळी जावे लागेल. यात कोणतीही शंका नाही. तरी पोलीस प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेऊन तातडीने योग्य त्या उपाययोजना कराव्या. अशी मागणी श्रीवर्धन शहरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# उरण बायपास सिडकोच्या ५०.२६ कोटी खर्चाच्या रस्त्याचे काम पुर्णत्वाकडे

### ३१ जानेवारी २०२६ रोजी कार्यान्वित होणार असल्याची सिडकोची माहिती

**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण ।** उरण शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सिडको बांधत असलेला ५०.६८ कोटी खर्चाच्या उरण बायपास रस्ता , पुलाचे काम ८५ टक्के काम पूर्ण झाले आहे.३१ जानेवारी २०२६ पुर्णत्वास जाणार आहे.त्यामुळे उरण शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न निकाली निघण्यात मोठी मदत होणार आहे.अशी माहिती सिडकोच्या जनसंपर्क अधिकारी प्रियांका रातांबे यांनी दिली.मात्र उनपच्या अखत्यारीतील ४०० मीटर लांबीचा जोडरस्ता तयार होत नाही. तोपर्यत या बायपास रस्त्यावरुन वाहतूक शक्य होणार नाही.



उरण उत्कर्ष समितीचे अध्यक्ष गोपाळ पाटील यांनी सातत्याने केलेला संघर्ष व वाहतूक कोंडीच्या समस्यांच्या पाठपुराव्यानंतरच सिडकोकडून उरण बायपास रस्त्याचे नियोजन करण्यात आले आहे. सिडकोने द्रोणागिरी नोड मधील आनंदी हॉटेल ते उरण शहरातील कनिष्ठस्तर न्यायालया पर्यंतचा १३४१ मीटर लांबीचा आणि ११ मीटर रुंदीचा बायपास रस्ता तयार करण्याचे काम सुरू आहे.या १३४१ मीटर लांबीच्या रस्त्यापैकी ४०० मीटर लांबीचा रस्ता उरण नगरपरिषदेच्या अखत्यारीत येत आहे. उर्वरित ९४१ मीटर लांबीचा बायपास रस्ता सिडको मार्फत बांधण्यात येत आहे.यामध्ये ६.४०.४२५ मीटर लांबीचा पुल व १५३.००४ लांबीच्या सिमेंट कॉक्रिटच्या रस्त्यासह १४८.०७१ लांबीच्या रिटेनिंग वॉलचा समावेश आहे. मागील सात आठ वर्षांपासून सुरू असलेल्या ५०.२६ खर्चाचे काम आता ८५ टक्के पुर्ण झाले आहे.सिडकोच्या अखत्यारीत असलेले उरण बायपास रस्त्याचे काम ३१ जानेवारी २०२६ अखेरीस पुर्ण होते अपेक्षित आहे.

हा बायपास रस्ता,पुल कार्यान्वित झाल्यानंतर उरण शहरातील जनतेचा वाहतूक कोंडीचा प्रश्न निकाली निघेल असा विश्वास सिडकोच्या जनसंपर्क अधिकारी प्रियांका रातांबे यांनी माहिती देताना व्यक्त केला आहे. याआधीच विलंबामुळे आठ कोटी खर्चाचे काम ५९.२६ कोटी रुपयांपर्यंत पोहचले आहे.मात्र सिडकोच्या अखत्यारीत ९४१ मीटर लांबीचा पूल व बायपास रस्ता पुर्ण झाला तरी जोपर्यंत उरण नगरपरिषदेच्या अखत्यारीत ४०० मीटर लांबीचा रस्ता तयार होणार नाही. तोपर्यंत बायपास रस्त्यावरुन वाहतूक शक्य होणार नाही. कारण उरण बायपास रस्त्याच्या कामात उरण नगरपरिषद हद्दीतील खासगी घरे, जमिनीही बाधीत होत आहेत.

उरण नगरपरिषद हद्दीतील खासगी १५ मुळ भोगवटादार आणि इतरांच्या मालकीच्या ४,२०० चौरस मीटर जमिनी संपादन करण्याचा निर्णय घेतला असला तरी उरण नगरपरिषदेकडे भोगवटादारांना मोबदला देण्यासाठी १२ कोटींचा आवश्यक निधी उपलब्ध नाही.उरण नगरपरिषदेने १२ कोटींच्या निधीसाठी शासनाला गाऱ्हाणे घातले आहे. उरणच्या विकास कामांसाठी सहा हजार कोटींचा निधी आणण्याचा दावा करणाऱ्या आमदार महेश बालदी यांनाही १२ कोटींचा निधीची तरतूद करणे अद्यापही शक्य झालेले नाही.यामुळे मात्र उरण बायपास रस्त्याच्या कामाचे घोंगडे भिजत पडले आहे.

सिडकोच्या अखत्यारीतील बायपास रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतरही उरण नगरपरिषदेच्या अखत्यारीतील फक्त ४०० मीटर लांबीच्या रस्त्याचे काम रखडलेले आहे.त्यामुळे उरण शहरातील वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. संपादीत करण्यात येणाऱ्या १५ भोगवटादारांना जमिनीचा मोबदला देण्यासाठी १२ कोटी निधीची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे.निधीसाठी पाठपुरावा सुरू आहे.उरण शहरातील वाहतूक कोंडीची समस्या कमी करण्यासाठी उरण बायपास रस्त्याचे काम तातडीने होण्याची आवश्यकता निर्माण झाली असल्याची माहिती उरण नगररचना विभागाचे सहाय्यक रचनाकार निखिल ढोरे यांनी दिली.

## कामगार नेते सुधीर घरत, सुरेश पाटील यांनी घेतली केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांची भेट

**दै.रायगड नगरी । उरण**

भारतीय पोर्ट अँड डॉक मजदूर संघाच्या वतीने कामगारांच्या विविध प्रश्नांसंदर्भात केंद्रीय पोर्ट व शिपिंग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांची ट्रान्सपोर्ट भवन दिल्ली येथे पोर्ट महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील , राष्ट्रीय कोषाध्यक्ष सुधीर घरत , अध्यक्ष श्रीकांत राय व इतर पदाधिकाऱ्यांनी भेट घेतली.

यावेळी पोर्ट मधिल कामगारांच्या वेतन करारातील राहिलेल्या विषयांवर चर्चा होऊन द्विपक्षीय वेतन करार समितीच्या सब कमिटीच्या रिपोर्टची लवकरात लवकर अंमलबजावणी करावी असे सांगितले.बोनस कराराची पूर्तता करावी , स्टॅगनेशन , निवृत्त कामगारांच्या पेन्शन तसेच सर्व मेजर पोर्ट मध्ये सीक्रेट बॅलेट पद्धतीने कामगार वेरिफिकेशन व्हावे ह्या विषयांवर चर्चा करण्यात आली .

तसेच सी फेरर्स च्या वतीने अक्षय बिरवाडकर व कॅप्टन इंदुलकर हे उपस्थित होते, त्याच्या देखील समस्यांबाबत चर्चा झाली.



# ठाणे–सीएसएमटी प्रवास सुस्साट ; शीव उड्डाणपुलाच्या समांतर दोन पदरी पूल उभारणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई महापालिकेने शीव उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणी त्याला समांतर (सायन) असा दोन पदरी उड्डाणपूल उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पाची व्यवहार्यता तपासण्यासाठी 'व्हीजेटीआय'ची निवड करण्यात आली आहे. नवा प्रवास उड्डाणपूल उभारला गेल्यास ठाणे ते सीएसएमटीदरम्यानचा अधिक सुलभ आणि जलद होईल, असा दावा महापालिकेने केला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील शीव उड्डाणपूल हा पूर्व–पश्चिम असा असून, त्याचे पुनबांधणीचे काम महापालिकेकडून सुरू आहे. हा पूल महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने बांधला होता. सध्या पुलावर 'दोन अधिक एक' अशी वाहनमार्ग व्यवस्था असून, ठाणे व पूर्व उपनगरांकडे जाणाऱ्या वाहनांसाठी दोन आणि दक्षिण मुंबईतील सीएसएमटीकडे जाण्यासाठी एक मार्ग आहे. वाहनसंख्या वाढल्याने येथे गर्दीच्या वेळी कोंडी निर्माण होते. त्यामुळे वाहतूक सुरळीत करण्यासाठी समांतर उड्डाणपूल प्रस्तावित आहे.

नवीन उड्डाणपुलामुळे ठाणे ते सीएसएमटीसाठी थेट पर्यायी मार्ग उपलब्ध होईल. दक्षिणेकडे जाणाऱ्या वाहतुकीसाठी स्वतंत्र मार्ग मिळून विद्यमान वाहतुकीतील ताण कमी होईल. प्रवास अधिक जलद, आरामदायी होऊन इंधनाची बचतही अपेक्षित आहे. या पुलाची गरज असल्याला वाहतूक पोलिसांनीही दुजोरा दिला आहे. या प्रकल्पाचा अंदाजे खर्च १५५ कोटी दोन लाख ३७हजार रुपये आहे.

महालक्ष्मी परिसरातील काही उड्डाणपूल विस्तारकामे एका कंत्राटदाराला देण्यात आली होती. मात्र, वाहतूक सह पोलिस आयुक्तांनी या कामांसाठी ना हरकत प्रमाणपत्र दिले नाही आणि संबंधित ठिकाणी पूल आवश्यक नसल्याचे नमूद केले. तसेच अतिक्रमणेही हटवली गेलेली नाहीत. त्यामुळे काम सुरू होऊ शकलेले नाही. भविष्यात हा कंत्राटदार अतिरिक्त शुल्काचा दावा करू शकतो. त्यामुळे हा विवाद टाळण्यासाठी नवीन पुलाचे काम त्याच कंत्राटदाराला देण्याचा महापालिकेचा विचार आहे.

शीव उड्डाणपुलाच्या पुनर्बाधणीचे काम वेगाने सुरू असून, हे काम मे २०२६पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. सध्या रेल्वे हद्दीतील कामे, रेल्वे पुलावरील उत्तर दिशेच्या अर्ध्या बाजूवरील गर्डर बसवणे, पोहोच मार्ग, दोन पादचारी भुयारी मार्ग आदी महापालिकेकडून सुरू आहेत. गर्डर बसवण्याची कामे एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात होणार असून, त्यानंतर रेल्वे हद्दीतील उर्वरित कामे पूर्ण केली जातील, असे रेल्वे सूत्रांनी सांगितले.

## महाराष्ट्र भूषण राम सुतार यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

जगप्रसिद्ध शिल्पकार महाराष्ट्रभूषण राम सुतार यांच्या पार्थिवावर नोएडा येथील वैकुंठ स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या वतीने राजशिष्टाचार व पणन मंत्री जयकुमार रावल यांनी पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली. तसेच केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनीही आदरांजली वाहिली.

जगातील सर्वात उंच पुतळा असलेल्या 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'चे शिल्पकार राम वंजी सुतार यांचे वृद्धापकाळाने नोएडा येथील निवासस्थानी वयाच्या १०१ व्या वर्षी निधन झाले होते. दुपारी नोएडा येथील वैकुंठ भूमीत संपूर्ण शासकीय इतमामात दिवंगत सुतार यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या वतीने यावेळी पणन मंत्री जयकुमार रावल यांनी आदरांजली वाहिली. रावल म्हणाले, जागतिक कीर्तीचे महान शिल्पकार पद्मविभूषण राम सुतार यांनी 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'सह अनेक ऐतिहासिक शिल्पांच्या माध्यमातून भारताची ओळख जागतिक पातळीवर नेली. त्यांच्या निधनाने कला क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. हुबेहूब आणि जिवंतपणा हे त्यांच्या कलेचे वैशिष्ट्य होते. त्यांची शिल्पे ही त्यांच्या महान कार्याची नेहमी साक्ष देतील.

अंत्यसंस्कारापूर्वी दिवंगत सुतार यांचे पार्थिव त्यांच्या निवासस्थानी दर्शनासाठी ठेवण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र शासनाच्या निवासी आयुक्त व सचिव आर विमला, माहिती संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे यांनी महाराष्ट्र शासन सांस्कृतिक विभागाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण केली. तसेच गौतम बुद्ध नगरच्या जिल्हाधिकारी मेधा रुपम यांनी उत्तर प्रदेश सरकारच्या वतीने श्रद्धांजली अर्पण केली. कला, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह दिवंगत सुतार यांच्या चाहत्यांनी त्यांच्या पार्थिवाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांचे पुत्र अनिल सुतार यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.



### पोलादपूरच्या मोरगिरी गावठाणात लाल बावट्याची जागा भगव्याने घेतली...

# मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते महादेव मंदिर जिर्णोध्दार व अंतर्गत रस्त्यांचे भूमिपूजन

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील मोरगिरी गावठाण येथे शिवसेनेतर्फे भव्य पक्षप्रवेश व विकासकामांचा भूमिपूजन सोहळा उत्साहात झाला असता महाराष्ट्र रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या विकासात्मक कार्याने प्रेरित होऊन अनेक ग्रामस्थांनी शेकाप पक्षाचा लाल बावटा ठेऊन शिवसेनेचा भगवा झेंडा हातात धरला. याप्रसंगी मंत्री भरत गोगावले यांच्याहस्ते महादेव मंदिर जिर्णोध्दार व अंतर्गत रस्त्यांचे भूमीपूजन करण्यात आले.



मंत्री भरत गोगावले यांचे मोरगिरी गावठाण येथे खालुबाजाच्या निनादात संपूर्ण गावातून भव्य मिरवणूक काढून सभास्थळी जल्लोषात स्वागत करण्यात आले. त्यानंतर मंत्री गोगावले यांच्याहस्ते पक्षप्रवेश घेण्यात आले. यामध्ये प्रमुख कार्यकर्ते सहदेव जाधव, दत्ताराम बामणे, काशीराम रांगडे, भागोजी पदरथ, सखाराम पदरथ, तुकाराम पवार, सखाराम पवार, महादेव जाधव, दगडू जाधव, चंद्रकांत पदरथ, हरिश्चंद्र पवार, पांडुरंग पवार, विठ्ठल पवार, बंटी पवार, प्रशांत पवार, मनोहर पवार, गोपाळ पवार, कैलास पवार, सुशांत पदरथ, विनोद पदरथ यांच्यासह मुंबई–पुणे–बडोदा येथील अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. सर्व प्रवेशकर्त्यांचे मंत्री भरत गोगावले यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व शिवसेनेत सर्वांना सन्मानाची वागणूक दिली जाईल, असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमास जिल्हा सहसंपर्कप्रमुख व माजी जि.प. सदस्य चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, ज्येष्ठ शिवसैनिक दशरथ उतेकर, उपतालुकाप्रमुख सतीश शिंदे, सुरेंद्र बांदल, शहरप्रमुख सुरेश पवार, विभागप्रमुख लक्ष्मण मोरे, युवासेना संपर्कप्रमुख विजय शेलार, माजी उपसभापती शैलेश सलागरे, नरेश सलागरे, दत्ताराम मोरे, स्वप्निल चोरगे, श्रीराम गायकवाड, अविनाश शिंदे, सरपंच विकास नलावडे, चंद्रकांत सणस, जगदीश महाडिक, सुयोग शिंदे, जनार्दन कदम, नितीन दळवी, प्रकाश शिंदे, संदीप शिंदे, प्रसाद मोरे, तानाजी निकम, अनिल दळवी, अनिल भिलारे, रामदास कळंबे, प्रकाश कदम, निलेश कुंभार, निलेश कंक, विजय मोरे, गीता दळवी, रामचंद्र ढवळे आदी पदाधिकारी उपस्थित राहिले.

यावेळी सर्व प्रवेशकर्त्यांनी यापुढे संपूर्ण मोरगिरी गावठाण शिवसेनेच्या बाजूने एकनिष्ठ राहील व येणाऱ्या निवडणुकांमध्ये शिवसेनेचा सिंहाचा वाटा असेल, असे एकमुखाने जाहीर केले. मंत्री भरत गोगावले यांनी यावेळी, मोरगिरी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी शिवसेना कटिबध्द आहे. तालुक्याच्या विकासासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील असून येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये शिवसेनेचा भगवा झेंडा नक्कीच फडकणार आहे, असा विश्वास व्यक्त केला. चंद्रकांत कळंबे यांनी मोरगिरी गावाच्या विकासासाठी नेहमी प्रयत्नशील राहण्याची ग्वाही दिली.

उपतालुकाप्रमुख सतीश शिंदे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, मोरगिरी गावातील कोटयवधींची विकासकामे नामदार भरत गोगावले यांच्या नेतृत्वामुळेच शक्य झाली असून भविष्यातही प्रत्येक वाडी–वस्तीतील विकासकामे शिवसेनेच्या माध्यमातून पूर्ण केली जातील. या पक्षप्रवेशादरम्यान संपूर्ण मोरगिरी गावठाण भगव्या झेंडयांनी व शिवसेनेच्या घोषणांनी दुमदुमून गेले.

## जिल्हाधिकारी किशन जावळे यांची स्ट्राँगरुमला भेट



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अलिबाग नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक–२०२५ च्या अनुषंगाने मतपेट्या ठेवण्यात आलेल्या जनरल अरुणकुमार वैद्य माध्यमिक विद्यालय, अलिबाग येथील स्ट्राँगरुमला भेट देवून तेथील सीसीटीव्ही कॅमेरे, पोलीस बंदोबस्त,सुरक्षा उपकरणे इत्यादी कार्यान्वित असल्याबाबतचा आढावा घेतला.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार अलिबाग विक्रम पाटील, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सागर सांळुखे, अजित टोळकर उपस्थित होते.